# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०००० १

ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org

क्र. सीईटी सेल/ तंत्र/संकीर्ण/२०१८/१०५६ दिनांक:- १०/०८/२०१८

प्रति,

मा. संचालक ,

तंत्र शिक्षण,

३ महापालिका मार्ग

मुंबई ४०० ००१

विषय: राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या निश्चित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकास मुदत वाढ देणेबाबत

संदर्भ: १.शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०६/तांशी-४ दि.९ ऑगस्ट २०१८

२. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे पत्र क्र. बार्टी /पुणे/सीव्हीसी/२०१८-१९/मुदतवाढ/एआरए/५५९२ दि. ०९/०८/२०१८

महोदय,

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० यामध्ये दिनांक २४/६/२०१८ च्या अध्यादेश क्र १७ द्वारे करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता मागास विद्यार्थ्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सदर करण्याचे अंतिम दिनांक प्रवेश नियामक प्राधिकरणाने प्रसिध्द केलेले आहेत व त्यास शासनाने दि. ४/७/२०१८ च्या पत्राने मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त संदर्भांकित पत्राद्वारे शासनाने असे कळविले आहे की, तंत्र शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त करून घेण्यात आलेल्या माहितीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता खालील प्रमाणे मागास प्रवर्गातील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे जात पडताळणी करण्याचे अद्याप प्रलंबित आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग/अभ्यासक्रम | अभियांत्रिकी | औषधनिर्माण | व्यवस्थापन शास्त्र |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ४६३ | ९१ | ९२५ |
| २ | वि.जा.-अ | १४८ | ७० | १३० |
| | भ.ज.-ब | १२४ | ३३ | १६० |
| | भ.ज.-क | १०४ | ५५ | १४१ |
| | भ.ज.-ड | ४१ | ०९ | ९२ |
| | ई.मा.व. | १०५७ | ४२० | ११४७ |
| | विमाप्र | १२६ | १९ | २४९ |
| | एकूण-२ | १६०० | ६०६ | १९१९ |
| | | | | |
| ३ | अनुसूचित जमाती | २३५ | ११७ | ७८ |
| | एकूण | २२९८ | ८१४ | २९२२ |

प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी , प्रथम वर्ष औषधनिर्माण/ फार्म डी. पदवी, प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी, प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नोलॉजी पदवी व प्रथम वर्ष एम.बी.ए./ एम. एम.एस. पदव्युत्तर पदवी या सर्व अभ्यासक्रमासाठी शासनाच्या मान्यतेने प्राधिकरणाने मागासवर्ग विद्यार्थ्यांकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक १० ऑगस्ट २०१८ असा निश्चित केला आहे. दि. ०७ ते ०९ ऑगस्ट, २०१८ पर्यंत राज्य शासकीय कर्मचारी संपावर असल्याने जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या कामावर त्याचा परिणाम झालेला आहे. यास्तव अभियांत्रिकी व इतर पदवी पूर्व/पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेमधून कोणत्याही मागास प्रवर्गातील विद्यार्थी वंचित राहू नये याकरिता या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याचा अंतिम दि. १४/०८/२०१८ असा निश्चित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही तत्काळ करावी असे कळविले आहे.

तसेच संदर्भ क्र. २ द्वारे महासंचालक, बार्टी तथा मुख्य समन्वयक जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या पुणे, यांनी देखील या पाच अभ्यासक्रमांच्या प्रमाणपत्र सादर करण्याच्या अंतिम दिनांकास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता वरील पाच अभ्यासक्रमांसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि. १४/०८/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. आपण नोडल अधिकारी म्हणून सर्व संबंधितांना या निर्णयाबाबत अवगत करावे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप जात पडताळणी प्रमाणपत्र upload केलेले नाही अशा सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना upload करण्याबाबत SMS/ E mail द्वारे वारंवार सूचित करण्यात यावे असे आपणास कळविण्याचे मला निदेश आहेत. संबंधित सूचना तात्काळ संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

(सुभाष का. महाजन)
परीक्षा समन्वयक,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.